**तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.**
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२ २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH E-mail : desk10@dte.org.in Internet :http/www.dte.org.in

***अधिसूचना*** क्रमांक : २अ/एडीएम/पदवी/२००६/१३९८
दिनांक : १७ ऑगस्ट २००६

**विषय : केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधील राऊंड-२ मध्ये अभ्यासक्रम ॲलॉट झालेल्या विद्यार्थ्यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधील राऊंड-१ मधील प्रवेश निश्चितीचे शिक्षण शुल्क व मूळ प्रमाणपत्रे तात्काळ परत करण्याबाबत**

शैक्षणिक वर्ष २००६-२००७ मधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधील राऊंड-१ मध्ये ज्या उमेदवारांना अभ्यासक्रम ॲलॉट झालेला आहे व संबंधित संस्थेत प्रवेश निश्चित केलेला आहे, त्यांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमधील राऊंड-२ मध्ये अलॉटमेंट मिळाल्यामुळे त्यांची राऊंड-१ मधील ॲलॉटमेंट आपोआप रद्द झालेली आहे. त्यामुळे सदर उमेदवारांना प्रथम मिळालेला प्रवेश रद्द करुन मूळ प्रमाणपत्रे आणि भरलेले शुल्क ( दि.२०/०८/२००६ पर्यंत २०% रक्कम कपात करुन उर्वरित शुल्क ) राऊंड-२ मधील प्रवेश तात्काळ निश्चित करणे क्रमप्राप्त आहे.

तरी त्याअनुषंगाने सर्व अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांना सूचित करण्यात येते की, जे उमेदवार राऊंड-२ मधील प्रवेश निश्चित करण्यासाठी राऊंड-१ मध्ये मिळालेला प्रवेश रद्द करुन मूळ प्रमाणपत्रे आणि भरलेले शुल्क (दि.२०/०८/२००६ पर्यंत २०% रक्कम कपात करुन उर्वरित शुल्क) परत घेण्यासाठी येतील त्यांना तात्काळ मूळ प्रमाणपत्रे आणि ऊर्वरित शिक्षण शुल्क परत करण्यात यावे, **ज्यामुळे उमेदवारांना प्रवेश घेणे सुखकर होईल. संस्थांनी यासाठी स्वतंत्र व्यवस्था तयार करावी, जेणेकरुन उमेदवारांना अडचण निर्माण होणार नाही.**

सही/-
**( प्रा. न. बा. पासलकर )**
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई